नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
संपादक : कमलाकर सोनकांबळे
YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - ३७ Issue - 37 | वार सोमवार दि. २३ जून २०२५ Blow- Monday Date 23 June 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# पहलगाम दहशतवादी हल्ल्याप्रकरणी एनआयएची मोठी कारवाई; पाकिस्तानी दहशतवाद्यांची ओळख पटली, २ जणांना अटक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

श्रीनगर : पहलगाम दहशतवादी हल्ल्याप्रकरणी एनआयएला मोठे यश मिळाले आहे. एजन्सीने पाकिस्तानातून आलेल्या लष्कर-ए-तैयबा (एलईटी) दहशतवाद्यांना आश्रय देण्यात सहभागी असलेल्या दोन लोकांना अटक केली आहे. पहलगाममध्ये २२ एप्रिल रोजी दहशतवादी हल्ला झाला होता. या हल्ल्याने संपूर्ण जग हादरलं होतं. पाकिस्तानातील दहशतवाद्यांनी पर्यटकांवर गोळ्या झाडल्या असून या हल्ल्यात २६ पर्यटकांचा मृत्यू झाला आणि १६ जण गंभीर जखमी झाले होते. अशातच या प्रकरणाचा तपास होत असताना दहशतवाद्यांना आश्रय देणाऱ्या दोघांना बेड्या ठोकण्यात आल्या आहेत. दरम्यान, अटक केलेल्यांची नावे परवेझ अहमद जोथर (बाटकोट, पहलगाम) आणि बशीर अहमद जोथर (हिल पार्क, पहल-गाम) अशी आहेत.

एनआयएच्या तपासात असे दिसून आले आहे की हल्ल्यापूर्वी दोघांनीही तीन सशस्त्र दहशतवाद्यांना त्यांच्या परिसरातील एका तात्पुरत्या झोपडीत (ढोक) आश्रय देऊन अन्न आणि आवश्यक वस्तू पुरवल्या होत्या. दहशतवादी हल्ल्यापूर्वी या दहशतवाद्यांना पूर्ण नियोजन करून आश्रय देण्यात आला होता. धार्मिक ओळखीच्या आधारे पर्यटकांना लक्ष्य करून हा हल्ला करण्यात आला.

पुढे आलेल्या माहितीनुसार, पर-वेझ आणि बशीर यांना बेकायदेशीर क्रियाकलाप (प्रतिबंध) कायदा १९६७ च्या कलम १९ अंतर्गत अटक करण्यात आली आहे. २२ एप्रिल २०२५ रोजी झालेल्या हल्ल्यानंतर सुरू झालेल्या छख केस ठउ-०२/२०२५/छख/गचण अंतर्गत हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, एनआयएने याबाबत पुष्टी केली आहे की, तिन्ही हल्लेखोर पाकिस्तानमधील लष्कर-ए-तोयबाचे सदस्य होते. सध्या या प्रकरणात अधिक तपास सुरू आहे.

पहलगाम दहशतवादी हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून, भारतीय सैन्याने ऑपरेशन सिंदूर अंतर्गत ६-७ मे च्या रात्री पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमध्ये असलेल्या ९ दहशतव-ादी अड्ड्यांवर हल्ला केला. यानंतर, पाकिस्तानने युद्धबंदीचे उल्लंघन केले आणि सीमेपलीकडून हल्ला केला, ज्यामुळे भारतीय सैन्याने पाकिस्तानवर जलद हल्ले सुरू केले. याचा परिणाम असा झाला की, पाकिस्तानचे अनेक हवाई तळ उद्ध्वस्त झाले. त्याआधी भारत सरकारने सिंधू पाणी करार रद्द केला. त्यामुळे पाकिस्तान संतापला. त्याच वेळी भारत सरकारने भारतात राहणाऱ्या पाकिस्तानी नागरिकांचे व्हिसा रद्द केले आणि त्यांना शेजारच्या देशात परत पाठवले.




## शेतकऱ्यांना कर्ज भरावेच लागेल : कृषीमंत्री कोकाटे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : विधानसभा निवडणुकीपूर्वी महायुतीने सत्तेवर आल्यानंतर राज्यातील शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याचे आश्वासन आपल्या जाहीरनाम्यात दिले होते. महायुतीने पुन्हा एकदा राज्यात सत्ता स्थ-ापन केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकारला आता सहा महिन्यांपेक्षा अधिक कालावधी उलटला आहे. मात्र, अद्याप कर्जमाफीबाबत कोणतीही ठोस घोषणा करण्यात आलेली नाही. त्यामुळे शेतकरी वर्गातून नाराजीचा सूर उमटत आहे.

यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कर्जमाफीबाबत मी अतिशय संवेदनशील आहे. कर्जमाफी कधी द्यायची, याचे काही नियम आहेत आणि त्यासाठी ठरलेली प्रक्रिया असते. सरकारने दिलेला एकही शब्द आम्ही मागे घेणार नाही. योग्य वेळी, योग्य निर्णय घेतला जाईल, असे वक्तव्य



केले होते. आता कर्जमाफीच्या प्रश्नावर राज्याचे कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांनी भाष्य केले आहे.

कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांनी कोपरगाव येथे माध्यमांशी बोलताना विविध मुद्द्यांवर भाष्य केले. यावेळी यावेळी शेतकऱ्यांच्या कर्जमाफीबाबत विचारले असता कर्जमाफीचा अधिकार मुख्यमंत्र्यांचा आहे. त्यांचा विचार लवकरच कार्यान्वित होईल. शेतकऱ्यांनी कर्ज भरलीच पाहिजेत. मात्र कर्जमाफी संदर्भातील निर्णय मुख्यमंत्री घेतील, असे त्यांनी मथळे आहे.

तर बोगस बियाणे आणि औषधांसंदर्भात ज्या कृषीसेवा केंद्राच्या बाबतीत तक्रार दाखल होईल, त्यावर तात्काळ कारवाई केली जाईल. माझ्याकडे तक्रार आली तर मी लगेच कारवाई करणार आहे, असा इशारा देखील त्यांनी यावेळी दिला.

सरकारने शेतीत भांडवली गुंतवणूक करावी ही माझी धारणा आहे.सरकार पाच

> **सरकारने दिलेला एकही शब्द आम्ही मागे घेणार नाही : कृषीमंत्री कोकाटे**

वर्षात २५ हजार कोटी रुपये भांडवली गुंतवणुकीसाठी खर्च करणार आहे. परदेशी धर्तीवर भारतातल्या शेतकऱ्यांना देखील न्याय मिळाला पाहिजे. सरकारी गुंतवणुकीम ुळे शेतकऱ्यांचा फायदा होईल, असेही माणिकराव कोकाटे यांनी म्हटले आहे.

दरम्यान, नाशिकच्या पालकमंत्री पदावरून महायुतीमध्ये गेल्या अनेक महिन्यांपासून रस्सीखेच सुरू आहे. या पदासाठी भाजपचे गिरीश महाजन आणि शिंदे गटाचे दादा भुसे आपापल्या पक्षातून आघाडीवर आहेत. त्याचबरोबर राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे आमदार माणिकराव कोकाटे यांचेही नाव चर्चेत आहे. यात अलीकडे राष्ट्रवादीच्या ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांना मंत्रीपद मिळाल्याने, नाशिकच्या पालकमंत्रीपदाच्या शर्यतीत त्यांचेही नाव पुढे आले आहे. त्यामुळे या पदासाठी आता चार संभाव्य दावेदारांच्या नावांची चर्चा सुरू आहे. याबाबत विचारले असता नाशिकच्या बाबतीत फार विवाद नाहीत. पालकमंत्री पदावर कुणाचाही दावा नाही. मुख्यमंत्री निर्णय घेतील आणि तो सर्वांना मान्य असेल, असे माणिकराव कोकाटे यांनी म्हटले आहे.

## अबू आझमींच्या फालतू वक्तव्याला उत्तर देणार नाही : मुख्यमंत्री

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : समाजवादी पक्षाचे आमदार अबू आझमी यांनी वारीसंदर्भात वादग्रस्त वक्तव्य केलं आहे. वारीमुळं रस्ता जाम होतोय, पण आम्ही कधी तक्रार केली नाही असे वक्तव्य आझमी यांनी केलं आहे. त्यांच्या या वक्तव्यावर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली आहे. अबू आझमी यांना वादग्रस्त विधानं करण्याचा शौक आहे. वादग्रस्त विधान केले की प्रसिद्धी मिळते असे त्यानं वाटते. त्यामुळं अबू आझमी यांना प्रसिद्धीच्या लायक समजत नसल्यामुळं त्यांच्या फालतू वक्तव्याला उत्तर देणार नाही असे फडणवीस म्हणाले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नागपुरातील मुख्यमंत्री सचिवालयात असलेल्या हैदराबाद हाऊस मध्ये कुंभमेळ्याच्या अनुषंगाने रस्ते विकासावर बैठक झाली. यावेळी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, मंत्री गिरीश महाजन, मंत्री शिवेंद्रराजे भोसले उपस्थित होते .

कुंभ मेळाव्याच्या अनुषंगाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना रोड नेटवर्क तयार करण्यासाठी ही विनंती केली होती. केंद्रीय मंत्री गडकरी यांनी बैठक घेत प्रमुख आठ रस्ते बनवण्याचा निर्णय घेतल्याचे देवेंद्र फडणवीस म्हणाले. छत्रपती संभाजीनगर ते नाशिक नागपूर ते नाशिक, नाशिकला जोडणाऱ्या सगळ्या रस्त्यांसंदर्भात तसेच अंतर्गत रस्त्या संदर्भात बैठक पार पडली. या सगळ्या रस्त्यांना मान्यता निधी उपलब्ध करून लवकरात लवकर काम पूर्ण करण्यात येईल असे फडणवीस म्हणाले. कुंभमेळ्याच्या काळात जे काय ट्रॅफीक उपस्थित होणार आहे. त्याचाही मार्ग, द्वारका सर्कल सुद्धा दोन फेज केला जाणार आहे. पहिल्या फेजमध्ये कुंभ सुरु होण्यापूर्वी केला जाईल. तर दुसऱ्या फ ेजमध्येही काम केले जाणार आहे. नाशिक आणि त्रंबक हा रस्ता जोडला जाणार आहे. काही ठिकाणी सहा पदरी तर काही ठिकाणी चार पदरी यांचा रोडला मान्यता दिली आहे.

नागपूरच्या विविध प्रकल्पांच्या संदर्भातही आढावा घेतल्याचे फडणवीस म्हणाले. नाग नदीवर एसटीपी करण्याचा अनुषंगाने अंडरग्राउंड वीज, वाहन तळासाठी शहराबाहेर वाहनतळ सगळ्या विषयावर चर्चा झाल्याचे फडणवीस म्हणाले. राहुल गांधी यांना देशात काय बनते हे माहीत नाही. मेक इन इंडिया राहुल गांधी यांना माहित नाही. जोपर्यंत काँग्रेसचे सरकार होते तेव्हा भारताची अर्थव्यवस्था ही अकरावी अर्थव्यवस्था होती. मागील दहा ववर्षात भारत जगातील चौथी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनवली आहे. राहुल गांधी यांनी याचा होम वर्क करावा असेही फडणवीस म्हणाले.

## आषाढी वारीच्या काळात पंढरपुरात सलग १० दिवस मास विक्रीस बंदी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : आषाढी वारीचा सो-हळा जवळ येत आहे. लाखो वारकरी पालख्यांसोबत पंढरीच्या दिशेनं आपल्या लाडक्या विठुरायाच्या भेटीसाठी मार्गस्थ होत आहेत. या काळात रस्त्यावर ठिकठिकाणी उघडपणे मास मटन विक्रीची दुकाने मार्गात लागत असतात. याशिवाय पंढरपुरात प्रवेश करतानाही विविध मार्गावर अशी मास मटन विक्रीची दुकाने आहे. गेल्या अनेक वर्षापासून पालखी सोहळा प्रमुख आणि वारकरी संप्रदायाचे संत मंडळी यांनी यात्रा कालावधीत पंढरपूर शहरातील आणि पा-लखी सोहळा येताना संबंधित गावातील मास मटन विक्री बंद ठेवण्याची मागणी करत होते. अखेर त्यांच्या या मागणीला यश आलं आहे. यंदा प्रथमच आषाढी वारीच्या इतिहासात यात्रा कालावधीतील सलग १० दिवस पंढरपुरातील मास मटन विक्रीस बंदी करण्यात आली आहे.

यावर्षी पहिल्यांदाच सोला-पूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांना आषाढी एकादशी पूर्वी सात दिवस व एकादशीनंतर तीन दिवस पंढरपूर शहरातील मास विक्री पूर्णपणे बंद ठेवण्याचे आदेश देण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्या पद्धतीने जिल्हाधिकाऱ्यांनी पंढरपूर शहरातील मास मटन विक्रीस यात्रा कालावधी मध्ये दहा दिवस पूर्णपणे बंदी घातली आहे. दरवर्षी केवळ तीन दिवस ही बंदी असायची मात्र आता वारकऱ्यांच्या आग्रही मागणीनंतर पंढरपूर शहरात सलग १० दिवस मास मटन विक्रीस पूर्णपणे बंदी राहणार असल्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी सांगितले.

दरम्यान, याच पद्धतीने पालखी मार्गावर ज्या दिवशी पालखी ज्या गावात प्रवेश करेल आणि त्या गावातून प्रस्थान ठेवेल तेवढा संपूर्ण कालावधी संबंधित गावातील मटन विक्रीस बंदी घालण्यात आलेली आहे.

**३ ठिकाणं, ७ बॉम्बर्स अन् २५ मिनिटे, ट्रम्प यांची देखरेख** — **समस्येत आणखी वाढ**

## अमेरिकाचा इराणच्या आण्विक तळावर बॉम्बहल्ला

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वॉशिंग्टन : अमेरिकेनं इराण विरोधातील आक्रमक भूमिका कायम ठेवत ऑपरेशन मिडनाईट हॅमर राबवलं. अमेरिकेनं हे ऑपरेशन केवळ २५ मिनिटांमध्ये पूर्ण केलं. या कालावधीत इराणच्या तीन आण्विक तळांवर हल्ले करण्यात आले. इराणच्या फोर्डो, नतान्ज आणि इस्पाहान येथील तळांवर हल्ले करण्यात आले. हे हल्ले ७ स्टील्थ इ-२ बॉम्बर्सद्वारे करण्यात आले. इराणच्या आण्विक तळांवर १२ बॉम्ब टाकण्यात आले. या ऑपरेशनमध्ये १२५ विमानांचा वापर करण्यात आला यामध्ये इराणची दिशाभूल करण्याची रणनीती राबवली गेली.


अमेरिकेचे जॉइंट चीफ ऑफ स्टाफ चेअरमन जनरल डॅन केन यांनी म्हटलं की ७ स्टील्थ इ-२ बॉम्बर्सचा वापर करण्यात आला. फोर्डो आणि नतान्ज येथील आण्विक तलांवर १३६०८ किलोग्रॅमचे बंकर बस्टर बॉम्ब टाकले गेले. इस्फाहानमध्ये टोमाहॉक क्रूझ मिसाईलचा वापर करण्यात आला. अमेरिकेच्या ७ स्टील्थ इ-२ बॉम्बर्सनी मिसौरी येथील एअरबेसवरुन उड्डाण घेतलं. १८ तासांच्या या मिशनला शांततेत पारपाडलं गेलं. ७ स्टील्थ इ-२ बॉम्बर्समध्ये प्रत्येक विमानात २-२ क्रू मेंबर्स होते. पूर्ण मिशन कमी कम्युनिकेशन ठेवून करण्यात आलं.




अमेरिकेनं हे हल्ले भारतीय प्रमाण-वेळेनुसार रविवारी पहाटे ४.१० वाजता केले. इ-२ बॉम्बर्सनं पहिल्यांदा फोर्डोवर दोन बंकर बस्टर बॉम्ब टाकले. यानंतर नतान्ज आणि इस्फाहानंवर हल्ले करण्यात आले. ४.३५ मिनिटांनी अमेरिकेची विमानं इराणच्या हवाई क्षेत्राच्या बाहेर निघून गेली होती.

केन यांनी दिलेल्या माहितीनुसार इरा-णवर अमेरिकेनं १४ बंकर बस्टर बॉम्ब, २४ टोमहॉक मिसाईल चा मारा केला. या मिशनमध्ये १२५ लष्करी विमानांचा समावेश होता. मध्य पूर्वेतील संघर्षात अमेरिकेनं हल्ला करण्याची पहिली वेळ आहे. जनरल केन यांच्या माहितीनुसार काही लढाऊ बॉम्ब वर्षाव करणारी विमानं पॅसिफिक महास-ागरावर सोडण्यात आली, याद्वारे इराणची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला गेला याला डिकॉय मिशन म्हटलं गेलं. याची माहिती वरिष्ठ अधिकाऱ्यांना होती.

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी आदेश दिल्यानंतर हे हल्ले करण्यात आले आ-हेत. त्यांनी व्हाईटहाऊसमधील सिच्युएशन रुममधून मिशनची देखरेख केली. केन म्हणाले इराणनं अमेरिकनं विमानांवर त्या देशात जाताना किंवा बाहेर पडताना हल्ला केली नाही. टोमहॉक मिसाईलनं इस्फाहानवर अखेरचा हल्ला केला. अमेरिकेचे संरक्षणमंत्री पीट हेगसेथ यांनी ऑपरेशन यशस्वी झालं असून इरा-णचा अणू कार्यक्रम पूर्णपणे नष्ट केल्याचा दावा केला. इराणला अणवस्त्रधारी देश होऊ द्यायचं नाही हा डोनाल्ड ट्रम्प यांचा निर्धार असल्याचं पीट हेगसेथ म्हणाले.



## पाऊले चालती पंढरीची वाट....

संत ज्ञानेश्वर महाराजांची पालखी सासवडचा दिवेघाट पार करुन उद्या सासवडला पोहोचेल, २३ जूनचा पालखीचा मुक्काम सासवड येथे असणार असून २४ जून सासवड ते जेजुरी असा पालखीचा प्रवास असणार आहे. जेजुरी नगरीत पालखीवर भंडाऱ्याची उधळण होणार आहे.

दैनिक
# यश सिद्धि न्यूज



## संपादकीय....

### मान्सूनची वाटचाल

राज्यभरात दोन ते तीन अंशांनी कमाल तापमानात वाढ होणार असल्याचे प्रादेशिक हवामान केंद्राने सांगितलं .कोकण मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात पुढील दोन दिवसात तापमानात फारसा परिणाम होणार नाही .विदर्भात तापमान दोन ते तीन अंशांनी घसरेल असा अंदाज आहे . सध्या कोकणपट्ट्यात व विदर्भात तुरळक ठिकाणी पावसाचा जोर चांगलाच वाढला आहे . मराठवाड्यातही पावसाला पोषक स्थिती असून मध्य महाराष्ट्रात काही ठिकाणी पावसाची उघडीप आहे . हवामान खात्याने आज रायगड रत्नागिरीसह पुणे घाट परिसरात ऑरेंज अलर्ट दिला आहे . या भागात मुसळधार पावसासह वादळी वारे वाहण्याची ही शक्यता आहे . मुंबई ,ठाणे, पालघर, नाशिक घाटमाथ्यावर तसेच तळ कोकणात सिंधुदुर्ग सातारा व कोल्हापूर माथ्यावर जोरदार पावसाची शक्यता आहे .या भागांना हवामान विभागाने येलो अलर्ट दिलाय .मराठवाड्यात आज परभणी, हिंगोली आणि नांदेड या तीन जिल्ह्यांना येलो अलर्ट देण्यात आला असून विदर्भात अमरावती, नागपूर ,भंडारा, चंद्रपूर, आणि गडचिरोली तसेच नंदुरबारमध्येही पावसाचा अलर्ट आहे . पुढील तीन दिवस मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता आहे. प्रादेशिक हवामान केंद्र मुंबई येथून प्राप्त झालेल्या अंदाजानुसार पुढील तीन ते चार तासात बीड, परभणी, छत्रपती संभाजीनगर व जालना जिल्ह्यात तुरळक ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे .पुढील तीन दिवस मराठवाड्यात मध्यम ते जोरदार पाऊस होण्याची शक्यता असून दोन दिवसांनी पावसाचा जोर आणखी वाढणार आहे . तळ कोकणापासून ते मुंबई पालघर पर्यंत किनारपट्टी असणाऱ्या भागात पावसाला पोषक वातावरण तयार झाले आहे .सिंधुदुर्ग रत्नागिरी रायगड या भागात पुढील तीनही दिवस पावसाचे तीव्र अलर्ट देण्यात आले असून सोमवारी या जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट आहे .पुणे, सातारा, कोल्हापूर व नाशिक घाट परिसरात पावसाचे येलो अलर्ट देण्यात आले आहेत . पुढील दोन दिवसात विदर्भ मराठवाडा व उत्तर महाराष्ट्रातही पावसाचा जोर वाढणार असल्याचं हवामान विभागाने सांगितलं आहे ..कल्याण, डोंबिवली व पालघर भागात मेघगर्जनेसह ढगांची संख्या ४.५ किमी पर्यंत असल्याचे दिसून आले आहे. पुढील २.३ तासांत मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता आहे. भारतीय हवामान खात्याच्या सध्याच्या अंदाजावर लक्ष ठेवा. असा इशारा हवामान विभागानं दिलाय.

# कवी युवराज गंगाराम यांच्या आंबेडकरवादी कवितेमुळे मराठी कवितेचे दालन अधिक व्यापक आणि समृद्ध

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

संशोधन करत असताना कवी युवराज गंगाराम यांची तीन कवितासंग्रह अभ्यासाला घेतले आहेत. यांच्या कवितेने आंबेडकरवादी कवितेला नवे वळण दिले. तसेच मराठी कवितेचे दालन अधिक व्यापक आणि समृद्ध केले आहे. चिंतनकाव्य, संवादकाव्य अशी त्यांच्या कवितेची वैशिष्ट्ये आढळून आले. त्याबरोबरच सामाजिक, सांस्कृतिक आणि भाषिक जाणिवा यांचा मनमोकळ्यापणाने, स्वातंत्र्यरीत्या अभ्यास करता आला. त्यामुळे त्यांना भेटून प्रत्यक्ष मुलाखत घेतली आहे.

**प्रश्न : सर, आपला संपूर्ण परिचय द्यावा ?**

कवी : नाव- युवराज गंगाराम मेश्राम, मु. तई/बरव्हा, ता. लाखादूर, जि. भंडारा.

**प्रश्न : आपणास आवडणारे कवी/लेखक कोणते ?**

कवी : स्मशानाची बेटे उध्वस्त करण्याची भाषा बोलणारे कवी कवी, लेखक मला आपले वाटतात. जीवनवादी भूमिका घेऊन जे जे लिहितात ते ते मला आपले वाटतात. गावाच्या बाहेरही एक जग आहे त्या बहिष्कृत यांच्या वस्ती बद्दल कळवळा व्यक्त करतात ते मला आपले वाटतात. इतकेच नाही तर वस्तीच्या बाहेरही एक वस्ती आहे आणि ती जंगलात आहे त्यावर अभिव्यक्त होतात ते मला आपले वाटतात. पाडा तांडा याचे जीवन संदर्भ ज्या साहित्यात आविष्कार करतात ते मला आपले वाटतात. मानवी जीवनाच्या चढउतारावर जे भाष्य करतात ते मला आपले वाटतात. व्यवस्थेतील गतिरोधक जे बुडापासून उपटून फेकतात ते मला आपले वाटतात. समाज आणि चळवळ हे एकाच परिप्रेक्षात जन्माला येते असे जे म्हणतात ते मला आपले वाटतात. मी असेच कवी लेखक वाचतो जो आपला हिल्लोळ ढवळून काढतील. मी ललित साहित्य फारसे वाचत नाही. कारण त्या साहित्याने समाज परिवर्तन केले असा इतिहास नाही. म्हणून कविता असो, कथा असो, लेखअसो नाटके असो वा आत्मचरित्र असो मला समाज स्पंदन चित्रीत दिसते ते ती मी वाचतो. कबीर, तुकाराम, रवींद्रनाथ टागोर, अल्बर्ट काम्यू, ऑर्थर कोएस्लर, बर्टोल्ड ब्रेख्त, सात्र, मंटो, फैज, अमृता, नामदेव ढसाळ, राजा ढाले, नारायण सुर्वे, यशवंत मनोहर, चेरा हे आवडतात. लोकनाथ यशवंत आणि मी तर तीन वर्ष एकाच अग्नी शाळेत होतो. त्यामुळे त्याचेही व्यक्तिमत्त्वाचा परिणाम माझ्यावर त्याने सुचविलेल्या थीम्स, त्यावर कविता करणे. तासंतास कवितेवर बोलणे, त्यामध्ये प्राचार्य कमलेश पाटील, कवी भगवान ठग सहभागी होणे आणि त्यामध्ये प्रस्थापितांचा बंदिस्त बुरुज उध्वस्त करण्यासाठी कवितेने धडका मारणे असे सुरू होते. त्यामुळे माझ्या लिखाणात तप्त विद्रोह आहे त्याचे हेच कारण आहे.

प्रश्न : आपला आवडता छंद कोणता ?

कवी : आंबेडकरवादी कविता ही बुद्धाच्या धम्मपदाशी नाते सांगते. कबीराच्या दोह्याशी बोलते. फुल्यांच्या सत्यशोधकीशी बांधिलकी मानते. त्यामुळे इतर वांग्मय प्रकारापेक्षा मला कविता अधिक आपल्याजवळ खेचून घेते. मी स्टॉलवर गेलो की कवितांचं पुस्तक मला प्रथम पाहावेसे वाटते व नंतरच दुसऱ्या वाड. मयाकडे वळतो. लहानपणापासूनच म्हणजे मी नववीत असताना लोकमत घरी यायचा. मोठा भाऊ लोकमतचा वार्ताहर असल्यामुळे त्याची एक प्रत फुकटात यायची. घरी टोकाची गरिबी असल्यामुळे वृत्तपत्र विकत घेण्याची ऐपत नव्हती. बरे माझ्या बापाला मोडी लिपी वाचता येत होती. पावकी, दिडकी मुखोदगत होती. बाबा पेपर वाचायचा. मी सुद्धा वाचत होतो. तिथे येणारे लेख कविता व त्याखाली कवी लेखकांचे नाव पाहून मी मोहरून जात होतो. वृत्तपत्रातील अनेक अक्षरे जुळवून मी युवराज गंगाराम मेश्रामअसे शब्द कोऱ्या कागदावर भाताच्या शिताने चिटकवीत होतो व माझेही नाव पेपरला आले तर.. अशा स्वप्नांनीच मी आनंदी व्हायचो. स्नेहसंमेलनात शाळेमध्ये एक हस्तलिखित काढण्यात आले. त्यामध्ये माझी कविता होती. 'मी गरीब आहे' फक्त तेवढे शीर्षक आठवते. बाकी कविता काय होती हे मला माहित नाही. मात्र हितवादचे संपादक ग.त्र्यं परांडे यांनी कविता पाहून मला कोटाच्या खिशातला पेन दिला. तिथून मी कवितेकडे सापेक्ष दृष्टीने पाहू लागलो.

**प्रश्न : आपणास लेखनाची प्रेरणा कशी मिळाली ?**

कवी : कविते कडे फार गांभीर्याने पाहतो. कविता आपल्याशी बोलली पाहिजे. कवितेने सतत कवीशी संवाद साधायला पाहिजे. कवितेत कवीचे रक्तअसावे तरच तो कविता जगेल. कविता बाबासाहेबांच्या क्रांतीचा विश्वविचारच दुबळ्याच्या दरवाजापर्यंत ऊर्जा घेऊन जाणारी असावी. हीच कविता बहुजन हिताय बहुजन सुखाय अशी चरित भिक्खवे असावी. आंबेडकरी कविता कुरूपतेला सौंदर्य कधीच समजत नाही तर ती सौंदर्याची बीजे पेरते. जेणेकरून तिथून सौंदर्यच उगवेल. कवी हा प्रकाशयात्रिक असला पाहिजे तरच त्याची कविता उजेडाचे दान देत फिरेल.

**प्रश्न : आपली कवितेकडे पाहण्याची दृष्टी काशी आहे ?**


युवराज गंगाराम यांच्या काव्यसंग्रहाची मुखपृष्ठे




०१) **डायरी**, शताब्दी प्रकाशन, गोंदिया, १४ एप्रिल १९९२




०२) **काही राहिलेल्या नोंदी**, शताब्दी प्रकाशन, गोंदिया, २२ ऑक्टो. २००४




०३) **एक पूर्णविराम अनेक प्रश्नचिन्ह**, आकांक्षा प्रकाशन, नागपूर, २६ जानेवारी २०२७

कवी : कवी आणि कवितेचे असे गुंतून पडणारे नाते आहे. कवी कविते शिवाय राहूच शकत नाही जेव्हा एखादी घटना कवीला स्वस्थ बसू देत नाही तिथपर्यंत त्याने लिहूच जखमेतून भळाभळा रक्त सांडत राहील तशी कविताही भळाभळा सांडत राहील. आपली कविता चळवळ कशी होईल याचाही विचार कवीला करायचा आहे.



कारण कविता वैयक्तिक कधीच नसते तर ती समुदायाची असते. यातनांचे तुषार्त जेव्हा होते तेव्हा आपली लेखणी छिन्नी बनून अजिंठा कोरत असते. मानवी दुःखाच्या कविता माणसाला आकर्षित करून घेतात कारण त्यात दुःखाची आर्द्रता सर्वसमावेशक असते. मात्र दुःख चिंगम सारखे चगडत बसू नये. कारण वाचकाला त्यावर निरोधाचा उपाय सापडत नाही. घायाळ काळजांचा समूह दिशा गतिमान करतो. म्हणून कविता उजेडाच्या पातळीवर येऊन स्व शोध घेत असेल तर बरी असते. अशी अनाम दुःखाची प्रेरक जाणीव जेव्हा जीवनाचा प्रत्येक घेऊन येते तेव्हा कविता देदिप्यमान होते. असाच सोहळा साजरा करण्यात तिला आनंद होतो. कविताही अनित्यचे रूप घेऊन येत असेल तर प्रतीत्य समुत्पादनाचा प्रत्यय आल्याशिवाय राहत नाही. माणसाने स्वतः कवी झाल्याचा आनंदोत्सव साजरा तर करावा मात्र आपल्या नावासमोर कवी हे विशेषण लागले आहे याची सतत जाणीव ठेवावी. कभी हा असामान्य असतो. तू उठतो कसा, बसतो कसा, विचार करण्याची पद्धत काय? असे प्रश्न सर्वसामान्यांना पडत असतात. विचार करण्याचा प्रारंभ हा अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा विकास या अभिव्यक्तीतूनच विद्रोहाचा हुंकार वेदनेच्या वादळातून धावतो. त्यातून विद्रोहाच्या डोळ्यात आणि डोक्यात व्यवस्थेची उलथापालथ करणारा आंबेडकर गावतो.

प्रश्न : शैक्षणिक जडण-घडण, आलेल्या अडचणी आणि त्यावर मात करण्यासाठी कोणते व्यक्तिमत्व मार्गदर्शक लाभले ?

कवी : बारव्हा या गावाजवळ तई आहे. त्या गावचा विद्यार्थी माझा वर्गमित्र होता. पुढे आंबेडकर कॉलेजला शिकायला गेल्यावर त्याचा भाऊ प्राध्यापक जयंत शेंडे तिथे प्राध्यापक होते. कवितेवरचा जबरदस्त अभ्यास. ते मला कविता कसे लिहायचे याचे धडे देत होते. माझ्या मोडक्या तोडक्या कवितांवर त्यांनी संस्कार केले. दलित साहित्याचे वारे या काळात जोरात वाहत होते. डॉक्टर यशवंत मनोहर यांच्या उत्थान गुंफा या कवितासंग्रहाने मला वेढून टाकले. मात्र संध्याकाळच्या कवितेने मला ग्रेसमय होऊ दिले नाही. ज्यांच्या कवितेत समाज सापडत नाही त्यांचा ग्रेस होतो.

**प्रश्न : आंबेडकरवादी कविता व मराठी कविता यात काय फरक जाणवतो ?**

कवी : मराठी कविता म्हणजे ओठात एक व पोटात एक असा हा प्रकार आहे. तो आंबेडकरी कवितेतही अंशतः का होईना आहेत. मात्र बनवाबनवी हा प्रकार त्यामध्ये नाही. इथे प्रॅक्टिकल आणि थेअरी एकच असावी लागते तरच पाया मजबूत होतो. मराठी साहित्याचा पारंपारिक प्रवाह तेव्हा दलित साहित्याने पार बदलून टाकला. मराठी कवितेला हे हादरे १९६० नंतर बसू लागले. १९६० ते १९८०, १९८० ते२०००,२००० ते२०२० असा हा आंबेडकरवादी कवितेचा टप्पा आहे. तेव्हा दलित साहित्य म्हणून सांस्कृतिक वादळ मराठी कवितेला समृद्ध करत गेले. जुने जाऊ द्या म्हणून आज आंबेडकर युगाची मुद्रा साहित्यावर पक्की बसून आहे. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर हेच आपल्या साहित्याचे अधिष्ठान आहे. परिवर्तनशील युगाचा व जीवनाचा अत्यंत सूचक अर्थवाहक शब्द म्हणून आंबेडकरवादी साहित्य अस्तित्वात आले. आंबेडकरवादी कवितेने नकाराचा अर्थ व विद्रोहाची भूमिका मराठी साहित्याला आव्हान होते. चित्रे, सुर्व्य यांनाही आत्मा परमात्मा नाकारता आला नाही. तिथे नुकतेच यायला लागलेले आंबेडकरवादी जाणिवेचे कवी आत्मा परमात्मा नाकारतात हे मला महत्त्वाचे वाटते. त्यांच्या कवितेत गंडे धागेदोरे उपास तापास नवस इत्यादी शब्द आढळत नाहीत. मला हीच घटना विज्ञानवादी वाटते. सुर्वे तर मार्क्सवादी कवी होते तरीही ते ऐसा गा मी ब्रह्म असे का म्हणाले हे माझ्या आकलनाच्या बाहेर आहे. धर्म या देशाच्या शीर्षस्थानी बसला तेव्हापासून चवदार तळ्याला आग लागू नये आपण समता संघाला पासून पोसो दूर आहोत.

**प्रश्न : आंबेडकरवादी कवी म्हणून आपली भूमिका काय असेल ?**

कवी : धर्म स्वातंत्र्याला जीवनात स्थान दिल्यामुळे व्यवहारात समतेच्या तत्वाला तडे गेले. म्हणूनच भारतात एक संध समाज व समताधिष्ठित समाज निर्माण होऊ शकला नाही. या देशाला बहुजन हिताय बहुजन सुखाय असे अंधार चिरडून टाकण्याची परंपरा असूनही आपले जगणे आंबेडकर होऊ शकले नाही. धर्मांतराच्या नंतर आंबेडकरी कवितेत भारत भूषण उभे झाले. त्यांची मूल्य गर्भिता ही ऐरगैर्याची नाही. तर आंबेडकरी कविता म्हणजे समीक्षाशास्त्राने सावधगिरीने पावले टाकावी अशी ती शोध मोहीम आहे.

प्रश्न : सर, सामाजिक संदेश कोणता द्याल ?

कवी : सामाजिक संदेश म्हणजे माझे एवढेच सांगणे आहे की आपले प्रत्येक पाऊले हे बाबासाहेबांच्या बोटाच्या दिशेने असावे. बाबासाहेबांनी दिलेले त्रिशरण म्हणजे रिपब्लिकन पक्ष भारतीय बौद्ध महासभा आणि समता सैनिक दल हे जिवंत राहण्यासाठी आपल्याला काय करता येईल त्यासाठी आटापिटा करणे म्हणजे पुन्हा बाबासाहेब जगणे आहे.

धन्यवाद.

मुन्नाभाई नंदागवळी गोंदिया

## जागतिक योगा दिन २०२५

# विद्यार्थ्यांची योगाभ्यासातून निरोगी आरोग्याकडे वाटचाल



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : प्रिसिजन फाउंडेशन,सोलापूर, अहिल्याबाई प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय सोलापूर, फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार दिनांक २१ जून २०२५ रोजी सर्वंकष लैंगिकता शिक्षण प्रकल्प अंतर्गत जागतिक योग दिन साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाचे आयोजन विद्यार्थ्यांमध्ये योगाविषयी जागृती निर्माण व्हावी आणि आरोग्यपूर्ण जीवनशैलीचा संदेश मिळावा या उद्देशाने करण्यात आला होता.

या शिबिरात स्वामी विवेकानंद केंद्र, सोलापूरच्या योग प्रशिक्षिका ईश्वरी हत्तुरे, अश्विनी जमदाडे तर प्रिसिजन फाउंडेशन सर्वंकष लैंगिकता प्रकल्पाच्या कम्युनिटी मोबिलायझर सत्यभामा कांबळे, विकी शिवशरण, स्वप्निल सोनवणे आदींनी विद्यार्थ्यांकडून योगाचे प्रात्यक्षिक करून घेतले. पुढे त्यांनी विद्यार्थ्यांना व कर्मचाऱ्यांना योगाचे महत्त्व समजावून सांगितले. योग साधनेच्या विविध आसनान विषयी विद्यार्थ्यांना माहिती करून दिली. विद्यार्थ्यांनीही त्यांच्या मार्गदर्शनाखाली उत्स्फूर्तपणे सहभागी होत योगाभ्यास केला.

मान्यवरांचे स्वागत अहिल्याबाई प्रशालेचे प्राचार्य इस्माईल शेख, उर्दू स्कूलच्या मुख्याध्यापिका मेहजबीन शेख यांच्या हस्ते योग गुरूंचे स्वागत भेटवस्तू देऊन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रिसिजन फाउंडेशनचे मॅनेजर जनसंपर्क विभाग माधव देशपांडे, वैशाली बनसोडे, एफ. पी. ए. आय. चे चेअरपर्सन डॉ. एन. बी. तेली, मार्गदर्शक डॉ. श्रीकांत येळेगावकर, प्रशालेचे क्रीडाशिक्षक रमेश हेगडे, धनंजय धेंडे, शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड, कार्यक्रम अधिकारी वीरेंद्र परदेशी यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. तसेच सर्व शिक्षकवृंद आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी कार्यक्रमाचे सुयोजित आयोजन करून योग दिन यशस्वी करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली.

# पुणेकरांचा निरोप घेत दोन्ही पालखी सोहळा वेगवेगळ्या वाटेने पंढरपूरच्या दिशेने मार्गस्थ



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

हडपसर : टाळ-मृदंगाच्या तालावर, भजनात दंग वारकऱ्यांची पावले. वारकऱ्यांच्या मुखी ज्ञानोबा-तुकोबाचा गजर आणि आसमंतात घुमणारा टाळ-मृदुंगांचा नाद, खांद्यावर पताका, डोक्यावर तुळशी वृंदावन, गळ्यात वीणा, मृदंग, कपाळी चंदनाचा टिळा, अशा भक्तिमय वातावरणात संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराजांचा पालखी सोहळा पुणेकरांचा निरोप घेऊन हडपसरमधून वेगवेगळ्या वाटेने पंढरपूरच्या दिशेने मार्गस्थ झाला.

वैदुवाडी मगरपट्टा येथे दुरून दिसणारा माउली व तुकाराम महाराजांच्या पालखी रथाचा कळस पाहताच भाविक नतमस्तक झाले. विसावास्थळी रांगोळ्यांच्या पायघड्या व फुलांच्या वर्षावाने वारकऱ्यांचे स्वागत करण्यात आले.

हडपसरमध्ये दोन्ही पालखी सोहळ्यांच्या स्वागतासाठी रस्त्याच्या दोन्ही बाजूला गर्दी केली होती. हडपसर मार्गावर वारकऱ्यांना फराळाचे वाटप केले. पुण्यातून सकाळी ६ वाजता माउलीच्या पालखीचे प्रस्थान झाले. त्यानंतर सकाळी ८ वाजता शिंदे छत्री येथे आरती झाली. सकाळी ९ वाजून ५ मिनिटांनी संत ज्ञानेश्वर महाराजांची पालखी हडपसरला पोहोचली. संत तुकाराम महाराजांची पालखी दुपारी १२:२० वाजता गाडीतळावरील विसावा ठिकाणी आली. सुमारे दीड तासाच्या विसाव्यानंतर ती लोणी काळभोरला रवाना झाली. केवळ ४५ मिनिटांचा विसावा घेतल्यानंतर संत ज्ञानेश्वर महाराजांची पालखी सासवडकडे मार्गस्थ झाली.

यावेळी महिला व पुरुषांनी दर्शनासाठी रांगा लावल्या होत्या. खांद्यावर, पताका, डोक्यावर तुळसी वृंदावन, गळ्यात विना, मृदुंग, कपाळी चंदनाचा टिळा, मुखी ज्ञानोबा-तुकोबाचा गजर, चेहऱ्यावर विठ्ठलाच्या भेटीची आस, आसमंतभर घुमणारा टाळ-मृदुंगांचा नाद, असे रूप धारण केलेला वारकरी भक्तिमय वातावरणात सोहळा रंगला.

हडपसरवरून पालखी मार्गस्थ होत असताना वरुण राजाने आज विश्रांती घेतल्याने वारकऱ्यांचा पायी प्रवास सुखरूप झाला. ऊन-सावलीच्या खेळाने घामाच्या धारादेखील निघत होत्या.

पालिकेवर हद्दीतून ग्रामीण भागात दोन्ही पालखींचे प्रवेश होताच ग्रामस्थांनी केलेल्या स्वागताने वारकरी भारावून गेले. दोन वाजण्याच्या सुमारास माउलींनी दुपारचा विसावा उरळी देवाची येथे ठेवला, तर तुकाराम महाराजांच्या पालखीचा विसावा मांजरी फार्म येथे घेतला. वारकऱ्यांनी फराळाचा आस्वाद घेत तासाभराच्या विश्रांतीनंतर घाटाच्या पायथ्याकडे मार्गक्रमण करण्यास सुरुवात केली.

दिवे घाटाच्या नागमोडी वळणाचा प्रवास करण्यापूर्वी माउलींची पालखी वडकी नाला येथे सुमारे चारला पोहोचली. एक तासाची विश्रांती घेतल्यानंतर अवघड असा दिवेघाट चढण्यास सुरुवात झाली. यावेळी माउलींच्या रथाला वडकी नाला येथे तयार असलेल्या दोन बैलजोड्या लावण्यात आल्या. टाळ-मृदुंगाच्या गजरात वारकऱ्यांनी दिवेघाट चढण्यास सुरुवात केली.

वारीत वारकऱ्यांप्रमाणेच वासुदेवदेखील सामील झाले. त्यांची संख्या मोठ्या प्रमाणावर दिसत होती. आपल्या चिमुकल्यांना वारकऱ्यांची वेशभूषा करून सोहळा पाहणाऱ्यासाठी येणाऱ्यांची संख्या लक्षणीय होती. पुण्यातून पालखी सोहळ्यास निरोप देण्यासाठी पुणेकर यांनी सासवडपर्यंत पायी प्रवास केला.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# पंढरपूरचा कॉरिडॉर सर्वांच्या संमतीनेच होणार : पालकमंत्री गोरे

## महास्वच्छता अभियानातून स्वच्छतेचा संदेश घरोघरी पोहोचवण्याचे क्रांतिकारी कार्य झाले : पालकमंत्री जयकुमार गोरे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

**■ पंढरपूर शहर महास्वच्छता अभियान २०२५.....**

**■ आषाढी सोहळ्यात पंढरपूर येथे सर्व पालख्या, दिंड्या, वारकरी व भाविक यांची सर्वोच्च व्यवस्था करणार**

**■ महास्वच्छता अभियानात ४२ ठिकाणी अधिकारी, कर्मचारी, स्वयंसेवक व नागरिक यांनी स्वच्छता मोहीम राबवून बहुतांश पंढरपूर शहर स्वच्छ केले, सर्वांच्या कामांचे खूप कौतुक आहे**

**■ स्वच्छता अभियानातून १४८ टन कचरा गोळा करण्यात आला**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/सोलापूर (जिमाका) : पंढरपूर शहर महास्वच्छता अभियान २०२५ अंतर्गत एकाच वेळी सकाळी सात ते दहा या कालावधीत ४२ ठिकाणी स्वच्छता मोहीम राहुल १४८ कचरा गोळा करण्यात आला. या मोहिमेत सोलापूर जिल्हा प्रशासनातील अधिकारी, कर्मचारी, सामाजिक संस्थांचे स्वयंसेवक, विविध सामाजिक संघटना, पंढरपूर शहरातील नागरिक यांनी सक्रिय सहभाग घेऊन ही विठुरायाची नगरी बहुतांश स्वच्छ केली आहे. या मोहिमेतून पंढरपूर शहर व येथे येणाऱ्या हजारो भाविकांच्या घरोघरी स्वच्छतेचा संदेश पोहोचविण्याचे क्रांतिकारी कार्य घडले असल्याचे प्रतिपादन राज्याचे ग्रामविकास व पंचायतराज मंत्री तथा सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी केले.

पंढरपूर शहर महास्वच्छता अभियान २०२५ चा समारोप कार्यक्रम प्रसंगी पालकमंत्री जयकुमार गोरे मार्गदर्शन करत होते. यावेळी आमदार समाधान आवताडे, आमदार सचिन कल्याणशेट्टी, आमदार देवेंद्र कोठे, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, सोलापूर महापालिकेचे आयुक्त सचिन ओम्बासे, माजी आमदार प्रशांत परिचारक, पंढरपूरचे उपविभागीय अधिकारी सचिन इथापे, कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके,नगरपालिका प्रशासन अधिकारी वीणा पवार, पंढरपूर नगर परिषदेचे मुख्याधिकारी महेश रोकडे यांच्यासह विविध विभागाचे प्रमुख व मान्यवर उपस्थित होते. पालकमंत्री श्री गोरे पुढे म्हणाले की, या स्वच्छता अभियानातून श्री विठुरायाची नगरी स्वच्छ करण्याचे काम आपल्या सर्वांच्या श्रमातून झालेले आहे. ही वारी पूर्वीची स्वच्छता असून वारीनंतरही स्वच्छता करण्यात येणार आहे. या मोहिमेसाठी सोलापूर जिल्ह्यासह सातारा जिल्ह्यातील ही सामाजिक संस्थांनी पुढाकार घेतला असून आजच्या मोहिमेत सात ते आठ हजार स्वयंसेवक नागरिकांनी सहभाग घेतला. यामध्ये तरुणांचा सहभाग ही महत्त्वपूर्ण बाब होती व पुढील काळात या स्वच्छतेच्या संदेशाबाबत नागरिकांमध्ये प्रबोधन करतील व स्वतःही क्रियाशीलपणे राबवतील असे त्यांनी सांगितले.

### पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते सफाई मित्रांचा सन्मान

आजच्या महास्वच्छता अभियानात सहभाग घेऊन स्वच्छता मोहीम राबवलेल्या काही सफाई मित्रांचा प्रतिनिधी स्वरूपात पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यामध्ये लक्ष्मण गोविंद सोनवणे, रविकिरण दोडिया, श्रीमती शांता विठ्ठल वाघमारे ,अजय शंकर तावरे, ओंकार जनार्दन वाघमारे यांच्यासह कोळगाव ग्रामपंचायत तालुका श्रीगोंदा जिल्हा अहिल्यानगर यांचाही विशेष सन्मान करण्यात आला. तसेच लायन्स क्लब पंढरपूर, वृक्षप्रेमी ग्रुप पंढरपूर, एव्हर ग्रीन क्लब, क्रीडाई संस्था व लोकमान्य विद्यालय पंढरपूर यांचाही सत्कार करण्यात आला.

पंढरपूर शहरातील सर्व नागरिक व्यापारी, व्यावसायिक यांनी आपापल्या दुकानासमोर कचरा टाकण्यासाठी छोट्या छोट्या कचरा पेट्या ठेवाव्यात व त्यामध्येच कचरा टाकून तो नगरपालिकेच्या कचरा संकलन टीम कडे द्यावा. त्याप्रमाणेच विठुरायाच्या दर्शनासाठी पंढरपूर नगरीत येणाऱ्या वारकरी भावी यांनीही कचरा कोठेही रस्त्यावर टाकू नये नगरपरिषदेने उपलब्ध करून दिलेल्या जवळपासच्या कचराकुंड्यामध्येच कचरा टाकावा असे आवाहन पालकमंत्री गोरे यांनी करून स्वच्छ पंढरपूर,



स्वच्छ चंद्रभागा, नमामी चंद्रभागा यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत असे त्यांनी सांगितले.

पंढरपूर हे संपूर्ण राज्यासाठी महत्त्वाचे व पवित्र धार्मिक ठिकाण असून या विठुरायाच्या नगरीचा सर्वांगीण विकासासाठी शासन कटिबद्ध आहे. पंढरपूरच्या कॉरिडॉरच्या विषयी सर्वांच्या संमतीनेच पूर्ण करण्यात येणार असल्याची माहिती पालकमंत्री गोरे यांनी दिली. तसेच सर्व मानाच्या पालख्या सह अन्य पालख्या, दिंड्या यांचे प्रस्थान पंढरपूरसाठी झालेले आहे. आषाढी यात्रा सोहळ्यासाठी पंढरपूर येथे आल्यानंतर या सर्वांना सर्वोच्च व्यवस्था प्रदान केली जाणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. तसेच या मोहिमेत सहभाग घेतल्याबद्दल जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, महापालिका आयुक्त यांच्यासह सर्व विभाग प्रमुख, सामाजिक संस्था, नागरिक व स्वयंसेवक यांचे त्यांनी कौतुक केले.

### महास्वच्छता अभियानाचा शुभारंभ

पंढरपूर शहर महास्वच्छता अभियान २०२५ चा शुभारंभ छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी पालकमंत्री, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी व अन्य मान्यवरांनी छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसरात स्वच्छता केली.

आमदार समाधान आवताडे यांनी पालकमंत्री महोदयांनी त्यांच्या संकल्पनेतून वारी पूर्वी पंढरपूर शहर स्वच्छ करण्यासाठी राबवलेल्या महा स्वच्छता अभियानाचे कौतुक केले व वारी संपल्यानंतर ही अशी मोहीम राबवण्याची मागणी केली. प्रारंभी उपविभागीय अधिकारी सचिन इथापे यांनी प्रास्ताविकात स्वच्छता अभियानाचे महत्त्व सांगून प्रशासनाच्या वतीने येथे येणाऱ्या भाविकांना चांगल्या सुविधा देण्याबरोबरच शहर स्वच्छ व सुंदर ठेवण्यासाठी सर्वोत्तपरी प्रयत्न केले जाणार असल्याचे सांगितले. तर मोहिमेत सर्वांनी सहभाग घेतल्याबद्दल मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी आभार मानले.





खारघर वाहतूक पोलिस शाखेचा अनोखा उपक्रम

## वाहन चालकांसाठी दंड तपासणी व भरण्याची सुविधा उपलब्ध

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पनवेल (केतन भोज) : वाहन चालकाने नियमाचे उल्लंघन केल्यानंतर त्यांना ऑनलाईन दंड आकारला जातो. तो आकारलेला दंड भरायचा कुठे माहिती नसल्यामुळे वाहन चालक चालकांचा वेळ वाया जात होता ही बाब लक्षात घेऊन

खारघर उड्डाणपुला खालील मंकी पॉईंट येथील वाहतूक चौकी येथे वाहनचालकांसाठी दंड तपासणी व भरण्याची सुविधा खारघर वाहतूक पोलीस शाखेच्या वतीने उपलब्ध करून देण्यात आली आहे.याठिकाणी वाहन चालक आपल्याविरोधातील प्रलंबित दंड तपासू शकतात तसेच तिथेच दंडाची रक्कम भरू शकतात.वाहतूक पोलिसांकडून वाहन चालकांना या सुविधेचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.या उपक्रमामुळे वाहनचालकांना पोलीस ठाणे किंवा इतर कार्यालयात जावे न लागता थेट चौकीवरच आवश्यक ती कारवाई पूर्ण करता येणार आहे.यामुळे वेळेची बचत होणार असून वाहतूक व्यवस्थेत पारदर्शकता आणि शिस्त वाढण्यास मदत होईल या राबवत असलेल्या मोहिमेचे वाहन चालकांनी खारघर वाहतूक शाखेचे कौतुक केले आहे.

## आषाढी यात्रा काळात वारकऱ्यांसाठी चार लाख लिटर पाण्याचे नियोजन : मुख्याधिकारी महेश रोकड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : येत्या जुलै दिनांक ६ सरोजी होणाऱ्या आषाढी यात्रेनिमित्त एकादशी सोहळ्यानिमित्त पंढरपूर नगरपरिषद पाणीपुरवठा विभाग सज्ज झाला आहे. आलेल्या लाखो भाविकांची तहान भागवण्यासाठी दररोज सुमारे०४ कोटी लिटर स्वच्छ व निर्जंतुक पाण्याची व्यवस्था करण्यात आली असल्याची माहिती मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी दिली आहे.

पंढरपूर नगर परिषदेमार्फत दिल्या जाणाऱ्या प्रमुख मूलभूत सेवा सुविधांमध्ये पाणी वितरण ही व्यवस्था अतिशय महत्वपूर्ण आहे. आषाढी वारीच्या निमित्ताने गतवर्षी वीस लाख भाविकांनी आपली हजेरी लावली होती यंदाही हाच आकडा किंवा त्याच्यापासून जास्त भाविक येण्याची शक्यता आहे. पाणीपुरवठा विभागाने त्याचे नियोजन केले आहे. वारी पूर्वी पाणी साठवण्याची टाक्याची स्वच्छता व देखभाल दुरुस्तीची आवश्यकता ती कामे पूर्ण केली आहे. विद्युत मोटारींची आवश्यकता ती काळजी घेण्यात आली आहे.

अष्टमी ते पौर्णिमा या काळात मंदिर परिसरात प्रदक्षणा मार्गावर असलेली गर्दी लक्षात घेता दोन वेळा पाणीपुरवठा करण्याची नियोजन केले आहे. भक्ती सागर पत्रा शेड, दर्शन बारी, चंद्रभागा वाळवंट, गोपाळपूर, नळादौरी २४ तास पाणी



उपलब्ध करून दिले जाणार आहे. वाकडी येथील पाण्याचा हौद पाणीपुरवठा पालखीतळ, पाणीपुरवठा शौचालयासाठी नवमी व दशमी या कालावधीत २४ तास पाणीपुरवठा केला जाणार आहे.

पाण्याची शुद्धीकरण नियंत्रण करून करण्यासाठी टीसीएल पावडर, क्लोरीन वाय पी एसी पावडर, फेरी क लंब अधिक औषधांचा आवश्यक तो साठा करण्यात आला आहे. भाविकांची टँकर भरून देण्यासाठी मनीषा नगर पाणीपुरवठा केंद्र व भक्त सागर येथे स्वतंत्र व्यवस्था केली आहे. या ठिकाणाहून भाविकांना मोफत टँकर भरून देण्याची व्यवस्था केली आहे.

वारीच्या काळात भाविकांना पिण्याचे पाणी व सांडपाण्याची पाण्याची याची कमतरता भासणार नाही. याची पूर्ण दक्षता पंढरपूर नगरपालिकेने घेतली आहे. पालकमंत्री जयकुमार गोरे, व जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिलेल्या सूचनानुसार पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता राजकुमार काळे, दीपक जाधव, व भूषण घोडके, विठ्ठल खिलारी ,सतीश क्षीरसागर, विठ्ठल वाघे, आदीसह ८० हून अधिक कर्मचारी पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी सज्ज झाले आहेत.

## आमदार कायंदे यांच्या वाढदिवसानिमित्त विविध उपक्रमांचे जुनेद अली यांच्या कडुन आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे /बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी



आमदार मनोज कायंदे यांच्या वाढदिवसानिमित्त दुसरबीड सर्कलमध्ये जूनेद अली मित्र मंडळाच्या वतीने विविध सामाजिक उपक्रमांचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात शालेय विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक साहित्याचे वाटप, गरजू नागरिकांना फळवाटप तसेच इतर अनेक सामाजिक उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

या उपक्रमांमुळे समाजात सामाजिक बांधिलकीची जाणीव वाढीस लागेल, असे आयोजकांनी सांगितले. कार्यक्रमात स्थानिक नागरिकांची उपस्थिती मोठ्या प्रमाणात अपेक्षित असून, समाजाच्या विविध स्तरातून या उपक्रमांचे स्वागत होत आहे.कार्यक्रमाचे आयोजन साजरे करताना मंडळाच्या कार्यकर्त्यांनी समाजसेवेचे व्रत अंगीकारले असून, वाढदिवस साजरा करण्याचा हा आदर्श मार्ग इतरांनीही घ्यावा असे मत अनेकांनी व्यक्त केले.

## हन्नूर येथील अनंत चैतन्य प्रशालेत योगाभ्यास



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : योग ही भारताने संपूर्ण जगाला दिलेली अमूल्य देण आहे. सर्वे सन्तु सुखिना , सर्वे सन्तु निरामया हा योगाचा मुख्य उद्देश आहे. आरोग्य,आत्मशुद्धी, आणि मनः शांतीचा सशक्त मार्ग म्हणजे योग म्हणून एक पृथ्वी, एक आरोग्य या वैश्विक विचाराला समर्पित ११ वा आंतरराष्ट्रीय योग दिवस महर्षि विवेकानंद समाजकल्याण संस्था,अक्कलकोट संचलित अनंत चैतन्य प्रशाला, हन्नूर येथे अत्यंत प्रेरणादायी वातावरणात साजरा करण्यात आला.

प्रारंभी प्रशालेचे मुख्याध्यापक श्री. अशोक साखरे यांच्या हस्ते भारत मातेच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले. यानंतर प्रशालेचे संगीत शिक्षक श्री. सुरेश जाधव यांनी आजच्या आंतरराष्ट्रीय जागतिक दिनाच्या निमित्ताने प्रशालेत आयोजित योगाभ्यासाचे महत्त्व पटवून देऊन विद्यार्थ्यांना नियमित योग व प्राणायाम करण्याचे आवाहन केले.व प्रशालेचे क्रीडा शिक्षक श्री. शहाजी माने यांच्या कृतीपूर्ण मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांना योगाभ्यासाचे धडे देण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांचा उस्फूर्त सहभाग ,प्रसन्न वातावरणातील योगाभ्यास आणि सर्वत्र आरोग्यविषयक जागरुकतेची सकारात्मक उर्जा यामुळे हा उपक्रम अतिशय उत्तमरित्या संपन्न झाला. यावेळी पर्यवेक्षक श्री.ज्ञानदेव शिंदे, समस्त प्राध्यापक व शिक्षक बंधू-भगिनी शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

या आजच्या प्रशालेतील आतंरराष्ट्रीय योग दिनानिमित्त योगाभ्यासाचे संस्थेचे अध्यक्ष व आमदार मा. श्री. सचिनदादा कल्याणशेट्टी, संस्थेचे जेष्ठ संचालक व मार्गदर्शक मा. श्री.मल्लिनाथ कल्याणशेट्टी, प्रशालेचे माजी प्राचार्य तथा आधारवड मा. श्री. सिद्धेश्वर कल्याणशेट्टी, संस्थेच्या संचालिका सौ. शांभवीताई कल्याणशेट्टी, हन्नूरचे उपसरपंच व युवा नेते मा. श्री. सागरदादा कल्याणशेट्टी, संचालक श्री. मल्लिकार्जुन मसुती,शिक्षण विभाग प्रमुख सौ. रुपाली शहा, विज्ञान विभाग प्रमुख सौ. पुनम कोकळगी यांनी विद्यार्थ्यांचे तसेच योगप्रशिक्षक श्री. शहाजी माने व योग मार्गदर्शक श्री. सुरेश जाधव यांचे कौतुकासह अभिनंदन केले.

राज्याच्या ८० शहरातून निघालेली सायकल दिंडी पंढरपुरात विसावली

# केंद्रीय मंत्री रक्षा खडसे यांच्या हस्ते सायकल दिंडीचा पंढरपुरात शुभारंभ





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

**■ पंढरपुरात ४ हजार सायकल स्वारांची निघाली दिंडी**

**■ सायकल दिंडीने वारकरी परंपरेप्रमाणे केली नगर प्रदक्षिणा**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर /प्रतिनिधी : महाराष्ट्रातून आषाढीसाठी अनेक दिंड्या पंढरपूरकडे येत आहेत. अशातच महाराष्ट्रातील ८० शहरातून ४ हजार सायकलसची दिंडी पंढरपुरात येऊन पोहचली आहे. पंढरपुरात आज सायकल संमेलन होते आहे. या निमित्ताने सायकल स्वारांनी वारकरी परंपरेप्रमाणे सायकल वरून नगरप्रदक्षणा केली. केंद्रीय मंत्री रक्षा खडसे, ग्रामविकास व पंचायत राज मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे, खासदार धैर्यशील मोहिते पाटील, आमदार रणजीतसिंह मोहिते पाटील यांनी सायकल दिंडीचे उद्घाटन करून दिंडीत सहभाग घेतला.

फिट इंडिया या राष्ट्रीय कार्यक्रम अंतर्गत या दिंडीमध्ये सायकल सारख्या व्यायामाचे महत्व पटवून देण्यात आले. राज्यातील कानाकोपऱ्यातून आलेल्या सायकल स्वारांमुळे आज पंढरी नगरी वेगळ्याच आध्यात्मिक वातावरणात सामावून गेलेली पहायला मिळाली.

यावेळी उपयोगी पोलीस अधिकारी अर्जुन भोसले, मुख्याधिकारी महेश रोकडे उपस्थित होते.

# पत्रकारांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न सहन केला जाणार नाही : डॉ. विश्वासराव आरोटे यांचा इशारा!

■ पत्रकारांवर खोटे गुन्हे म्हणजे लोकशाहीची गळचेपी : डॉ. विश्वासराव आरोटे
■ शेतकऱ्याचे रक्त आमच्यात आहे, दोन हात करायचीही तयारी – डॉ. विश्वासराव आरोटे यांचा संघर्षशील इशारा!
■ अशोक पवार व गुन्हेगारांच्या संगनमताचा पर्दाफाश करणार – डॉ. विश्वासराव आरोटे
■ पत्रकारांवरील खोटे गुन्हे मागे घ्या, अन्यथा राज्यभर आंदोलन – डॉ. विश्वासराव आरोटे यांचा इशारा
■ पाचोरा पोलिसांचा अजब प्रताप!
■ अवैध धंद्यांविरोधात बातम्या प्रसिद्ध केल्याचा राग धरून पत्रकारांवर खंडणीचा खोटा गुन्हा – महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ आक्रमक!

## अवैध धंद्यांवर बातम्या दिल्यामुळे गुन्हे? अशोक पवारचा भांडाफोड करू – डॉ. विश्वासराव आरोटे आक्रमक!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पाचोरा/प्रतिनिधी :

पाचोरा शहरात गेल्या काही महिन्यांपासून अवैध व्यवसाय, जुगार, दारू, मटका, आणि इतर गुन्हेगारी प्रवृत्ती वाढत असताना स्थानिक पत्रकारांनी या धंद्यांचा पर्दाफाश करण्यासाठी वेळोवेळी माध्यमांतून आवाज उठवला होता. मात्र, या सत्य वृत्तांकनाचा राग मनात धरून पोलीस आणि गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या लोकांनी संगनमत करून, या पत्रकारांवर खंडणीचा खोटा गुन्हा दाखल केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे.

गुन्हा दाखल झालेल्या पत्रकारांमध्ये किशोरजी रायसाकडा यांच्यासह इतर तिघांचा समावेश आहे. हे सर्व पत्रकार स्थानिक गुन्हेगारी आणि पोलिसांच्या हातमिळवणीविरोधात सक्रिय होते. यामुळेच काही प्रस्थापित गुन्हेगारी मंडळी आणि पोलीस निरीक्षक अशोक पवार यांच्या मनात वैमनस्य निर्माण झाले आणि त्यांनी बदला घेण्यासाठी खोटा गुन्हा दाखल केला, असा गंभीर आरोप महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे यांनी केला आहे.

**भोला पाटील उर्फ शेखर पाटील आणि अशोक पवार यांची संगनमत?**

या प्रकरणात विशेष लक्षवेधी बाब म्हणजे, पत्रकारांवर खोटा गुन्हा दाखल करण्यामागे शेखर ऊर्फ भोला पाटील या गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तीचा थेट सहभाग आहे. भोला पाटील यानेच पोलिसांकडे खोटी तक्रार देऊन पत्रकारांविरुद्ध कारवाई केली. हे संपूर्ण प्रकरण पोलीस निरीक्षक अशोक पवार यांच्या संगनमताने घडले असल्याचा आरोप पत्रकार संघाकडून करण्यात आला आहे.

अशोक पवार सारख्यांना आम्ही उघड करण्यास वेळ लावणार नाही. ते कोणाच्या सांगण्यावर खोटे गुन्हे दाखल करत असतील, तर पत्रकार संघ गप्प बसणार नाही, असा इशारा डॉ. आरोटे यांनी दिला.

**पत्रकारांवरील अन्याय सहन केला जाणार नाही – डॉ. विश्वासराव आरोटे यांचा इशारा**

पत्रकारांवर दाखल केलेला गुन्हा त्वरित मागे घेण्यात यावा, अन्यथा राज्यभर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा ठाम इशारा पत्रकार संघाने दिला आहे. पत्रकार हा लोकशाहीचा चौथा स्तंभ आहे. त्यांच्यावर खोटे आरोप लावणे म्हणजे लोकशाहीची गळचेपी आहे. पोलीस प्रशासन जर गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांच्या प्रभावाखाली काम करत असेल, तर हे अत्यंत धोकादायक आहे, असेही डॉ. विश्वासराव आरोटे यांनी स्पष्ट केले.

त्यांनी पुढे सांगितले की, आमच्या पत्रकार बांधवांनी अवैध धंद्यांविरोधात सडेतोड भूमिका घेतली आणि पंधरा दिवसांपूर्वी पाचोरा पोलिसांना निवेदन दिले होते. मात्र पोलीस अधिकाऱ्यांनी त्याऐवजी गुन्हेगारांच्या दबावाला बळी पडून पत्रकारांवरच खोटे आरोप लावले. हा प्रकार आम्ही कदापिही सहन करणार नाही.

**मुख्यमंत्र्यांकडे तक्रार, पोलीस अधिकाऱ्यांवर त्वरित कारवाईची मागणी:**

या प्रकरणाची गंभीर दखल घेत महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ आणि संबंधित पत्रकारांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि गृह राज्यमंत्री योगेश कदम यांच्याकडे लेखी तक्रार सादर केली असून, संबंधित पोलीस निरीक्षक अशोक पवार यांची तात्काळ बदली करावी, भोला पाटीलवर कायदेशीर कारवाई करावी आणि पत्रकारांवर दाखल केलेले खोटे गुन्हे मागे घेण्यात यावेत, अशी जोरदार मागणी करण्यात आली आहे.

आमच्या अंगात शेतकऱ्याचे रक्त आहे. जर वेळ आली तर आम्ही दोन हात करण्यासही मागे हटणार नाही, असे म्हणत डॉ. विश्वासराव आरोटे यांनी आंदोलनाचे संकेत दिले आहेत.

**सार्वजनिक संताप वाढतोय – पत्रकार संघ एकवटला:**

या संपूर्ण प्रकारामुळे पाचोरा शहरात आणि जिल्हाभरात पत्रकारांमध्ये तीव्र संतापाचे वातावरण पसरले असून, सर्व पत्रकार संघटना एकवटत आहेत. पत्रकारांवर अन्याय झाल्यास, आम्ही संपूर्ण राज्यात तीव्र आंदोलन उभारू. अशोक पवार व भोला पाटील यांच्यावर गुन्हा दाखल होईपर्यंत आम्ही स्वस्थ बसणार नाही, असा निर्धार पत्रकार बांधवांनी व्यक्त केला.

न्यायासाठी लढा सुरु आहे. सत्य मूक होत नाही – आणि पत्रकाराच्या आवाजाला कुठलाही दबाव गप्प बसवू शकत नाही, हे लवकरच सिद्ध होईल!

# निफाड येथे पायी दिंडीचे स्वागत



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : निफाड येथे वैनतेय विद्यालयाचे प्रांगणात श्रीक्षेत्र खेडगाव ते श्रीक्षेत्र पंढरपूर या श्री संत निवृत्तीनाथ आषाढी वारी पायी दिंडीचे मोठ्या भक्ती भावाने स्वागत करण्यात आले

वैकुंठवासी संत जिनेश्वर काळू बाबा, वैकुंठवासी मल्हार बाबा, वैकुंठवाशी पाटील बाबा ,यांचे आशीर्वादाने सालाबाद प्रमाणे याही वर्षी दिनांक २१ जून २०२५ रोजी श्रीक्षेत्र खेडगाव तालुका निफाड येथून या दिंडीचे प्रस्थान झाले असून दिंडीचे हे पंधरावे वर्ष आहे, यावर्षीही या पायी दिंडी सोहळ्यामध्ये ३०० ते ५०० च्या आसपास महिला पुरुष वारकरी आहे , निफाड येथे या पायी दिंडीचे जळगाव ,निफाड, कातरगाव, आधी परिसरातील भाविक भक्तांनी टाळ मृदुंगाच्या गजरात विठू नामाच्या जयघोषात स्वागत केले

अनेक वारकरी यावेळी दिंडीत सामील झाले असून या दिंडीचा दररोज २२ ते २३ किलोमीटर हा प्रवास असतो ,पंधरा दिवसात हा दिंडी सोहळा पंढरपूर येथे दाखल होतो, या दिंडी सोहळ्याच्या माध्यमातून व्यसनमुक्ती ,स्वच्छता अभियान, अंधश्रद्धा निर्मूलन आदी चे समाज प्रबोधन केले जाते, दिंडीचे विणेकरी ह भ प तानाजी महाराज मौले ,संतोष महाराज बिलवडीकर तसेच चोपदार म्हणून हभप ज्ञानेश्वर मिंधे, राजेंद्र ठुबे ,बाळकृष्ण पीठे ,हे सेवा देत असून दिंडीचे व्यवस्थापन समस्त ग्रामस्थ भजनी मंडळ खेडगाव हे करतात,

# शालेय जीवनात आत्मविश्वासाने शिक्षण पूर्ण केले पाहिजे : भतगुणकी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पंढरपूर/प्रतिनिधी : विद्यार्थ्यांनी आपल्या शालेय जीवनात आत्मविश्वासाने शिक्षण पूर्ण केले पाहिजे. तरच विद्यार्थी आपल्या जीवनात यशस्वी होतात. असे मत ड्रीम फाउंडेशनचे संस्थापक व व्याख्याते काशिनाथ भतगुणकी यांनी व्यक्त केले.

पंढरपूर तालुक्यातील भाळवणी येथील न्यू इंग्लिश स्कूल व ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स भाळवणी येथे मी यशस्वी होणारच या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य के. डी शिंदे हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून उपसरपंच नितीन शिंदे पत्रकार प्रशांत माळवदे कीर्ती कॉम्प्युटर सेंटरचे राहुल ताटे देशमुख उपमुख्याध्यापिका मोरे पर्यवेक्षक बेसिकराव हे उपस्थित होते.

यावेळी काशिनाथ भतगुणकी म्हणाले की विद्यार्थ्यांनी आपल्या शालेय जीवनात आपले आई-वडील व गुरुजनांचा आदर ठेवला पाहिजे. आपल्या शालेय जीवनात एक स्वप्न पाहिले पाहिजे आणि ते स्वप्न पूर्ण करण्यासाठी अभ्यास, कष्ट ,मेहनत घेतली पाहिजे. आपले जीवन यशस्वी करण्यासाठी एक सुंदर स्वप्न मनामध्ये असले पाहिजे. ते स्वप्न पूर्ण करण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे.मनात आत्मविश्वास असला पाहिजे, शिस्त असली पाहिजे तरच आपण आपल्या जीवनात यशस्वी होऊ असे ही भतगुणकी यांनी सांगितले.


या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भारत विधाते यांनी केले तर आभार रणजीत दडस यांनी मानले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व शिक्षकांनी सहकार्य केले.

# मोकाट जनावरांच्या मालकांनी जनावरांचा बंदोबस्त करावा : मुख्याधिकारी महेश रोकडे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर शहरात सध्या आषाढी यात्रा भरत आहे. यात्रेसाठी राज्यातील विविध भागातून लाखो भाविक भक्त श्री विठ्ठल रुक्मिणीच्या दर्शनासाठी येत असतात. शहरात व उपनगरात सर्वत्र गाय, बैल, म्हैस व गाढव ही मोकाट जनावरे फिरत असतात. ही जनावरे गर्दीच्या ठिकाणी उधळल्यास मोठा अपघात होवुन जिवितहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे

जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या सुचनेनुसार नगरपरिषदेने काही मोकाट जनावरांचे मालकांना महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम २८९ नुसार नोटीस देण्यात आली आहे. तसेच शहरात व उपनगरात मोकाट फिरताना आढळुन आलेली ५५ जनावरे नगरपरिषदेकडील मक्तेदार यांच्या मार्फत दि.१६ जून पासुन पकडुन नगरपरिषदेच्या कोंडवाड्यात ठेवण्यात आलेली आहेत. त्यामुळे सर्व जनावरांचे मालकांनी यात्रा कालावधीमध्ये नगरपरिषदेस सहकार्य करावे, असे आवाहन मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी केले आहे.







महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम २८९ नुसार १० दिवसांचे आत अशा जनावराचा मालक किंवा अभिकर्ता जनावरांची मागणी करेल. परंतू कोंडवाड्याची फी व आकारण्यात येणारा खर्च देण्यास नकार देईल. तसेच जे जनावरांचे मालक जनावरे सोडविण्यास येणार नाहीत, अशी जनावरे महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम २८८ नुसार सदर जनावरांचा लिलाव करुन त्याची विक्री केली जाईल. किंवा गोशाळेकडे दिली जातील, याची गांभीर्याने नोंद घ्यावी, असे सुचित केले आहे.

**एकल वापर प्लास्टीक बंदी**

राज्य शासनाने एकल वापर प्लास्टिक बंदी केली आहे. महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडुन एकल वापर प्लास्टिक अर्थात सिंगल युज प्लास्टिक यांचा वापर करु नये असे आदेश देण्यात आलेले आहेत. त्यानुसार पंढरपूर नगरपरिषदेमार्फत पंढरपूर शहरातील महाद्वार परिसरात दि.४ जून पासुन प्लास्टिक बंदी मोहीम सुर केली आहे. शहरातील नागरीक, आस्थापना यांना एकल प्लास्टिक तसेच प्लास्टीक, थर्माकॉलपासून बनविण्यात येणार्या वस्तु यामध्ये ताट, कप्स, प्लेटस, ग्लास, काटे, वाटी, चमचे, प्लास्टिक पिशव्या इत्यांदीचा वापर करु नये. यात्रा कालावधीमध्ये नगरपरिषदेस सहकार्य करावे, असे मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी आवाहन केले आहे.

# कर्मयोगी इन्स्टिट्यूट मध्ये जागतिक योग दिन मोठ्या उत्साहात साजरा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : श्री पांडुरंग प्रतिष्ठान संचालित कर्मयोगी इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी शेळवे दिनांक २१ रोजी जागतिक योग दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी योग शिक्षक ननवरे यांनी दैनंदिन जीवनातील योगाचे महत्व विद्यार्थ्यांना पटवून दिले विविध योगासने व प्रात्यक्षिक सहित करून दाखवली. महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण व राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

यावेळी बोलताना अशोक ननवरे म्हणाले, युवाने शारीरिक आणि मानसिक आरोग्यासाठी अनेक फायदे आहेत, त्यामध्ये चार शरीराची लवचिकता , सामर्थ्य असंतुलन, आणि हृदय रक्तवाहिन्यासंबंधी आरोग्याच्या यामध्ये समावेश आहे. तसेच चिंता आणि नायराशी कमी करणे आणि निद्रा उदाहरणा करण्यासाठी योग महत्त्वाची भूमिका बजावतात तर आणि मग त्याचा एकत्रित व्यायाम म्हणजे योगा आहे असे सांगून योगाचे महत्त्व पटवून दिलेले आहे व आजच्या धकाधकीच्या जीवनात योगाच्या माध्यमातून आपण आपले शरीर तर तंदुरुस्त ठेवू शकतो, शिवाय मनावरही चांगले संस्कार करू शकतो असे सांगून त्यांनी जीवनामधील योगाचे महत्त्व सांगितले.

श्री पांडुरंग प्रतिष्ठानचे चेअरमन रोहन परिचारक यांनी जागतिक योग दिनाच्या सर्वांना शुभेच्छा दिल्या व यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर एस पी पाटील कर्मवीर इन्स्टिट्यूट चे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर ए बी कणसे रजिस्टर जीडी वाळके उपप्राचार्य प्राध्यापक जेल मुळेगावकर संशोधन अधिष्ठाता डॉक्टर अभय उत्पाद शैक्षणिक अधिष्ठाता प्राध्यापक राहुल पांचाळ विभाग प्रमुख डॉक्टर एस एम लंबे डॉक्टर एस व्ही एकलांकर प्राध्यापक अनिल बाबर प्राध्यापक दीपक भोसले तसेच अनेक प्राध्यापक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे विभाग प्रमुख प्राध्यापक गणेश बागल यांनी या कार्यक्रमाचे संयोजक म्हणून काम पाहिले.

## आषाढी यात्रेत वारकरी व भाविकांना १०८ रुग्णवाहीकेव्दारे आरोग्य सेवा देण्यात येणार

# मंदिर सुरक्षा रक्षकांना तसेच आरोग्य अधिकारी व कर्मचाऱ्यांना सीपीआर व गुड समारिटन ॲप बाबत दिले प्रशिक्षण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पंढरपूर/प्रतिनिधी : आषाढी यात्रेत येणार्या वारकरी व भाविकांना आरोग्य सेवा वेळेत देता याव्यात, याकरीता श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीच्या कामगार, सुरक्षा रक्षकांना व आरोग्य विभागातील अधिकारी व कर्मचारी यांना गुड समारिटन मोबाईल ॲप व कार्डिओपल्मोनरी रिसक्सटिशन (सीपीआर) याबाबतचे प्रात्याक्षिकासह मार्गदर्शन करत प्रशिक्षण देण्यात आले.

श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीच्या संत तुकाराम भवन येथे दि. २१ जून रोजी १०८ चे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. ज्ञानेश्वर शेळके, पंढरपूर तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. एकनाथ बोधले यांच्या मार्गदर्शनाखाली मार्गदर्शन करण्यात आले. एखाद्या रुग्णाला रुग्णवाहिका पोहोचेपर्यंत प्राथमिक उपचार देता यावेत. यासाठी प्रात्याक्षिकासह मार्गदर्शन करण्यात आले. यामुळे वारी काळातील रुग्णांना वेळेवर औषधोपचार, वेळेवर वैद्यकीय मदत मिळून रुग्णाच्या जीवित्तास धोका कमी करण्यास मदत होणार आहे.

तसेच आरोग्य विभागाने यावर्षी नावीन्यपूर्ण उपक्रम राबवीत 'गुड समारिटन' नावाचे मोबाइल ॲप्लिकेशन सुरू केले आहे. या ॲपच्या माध्यमातून वारकर्यांना आपत्कालीन वैद्यकीय मदतीसाठी त्वरित संपर्क साधता येणार आहे. ॲपवर आलेल्या माहितीवरून रुग्णवाहिका चालकाला रुग्णाचे ठिकाण अचूक कळणार. यामुळे वारीतील रुग्णांना वेळेवर वैद्यकीय मदत मिळून रुग्णाच्या जीवितास धोका कमी होण्यास मदत होणार आहे. 'गुड समारिटन' हे ॲप शासनाच्या आरोग्य विभाग आणि एसपीईआरओ या संस्थेच्या संयुक्त विद्यमाने विकसित करण्यात आले आहे. ॲपल स्टोअर आणि गुगल प्ले स्टोअरवरून ते मोफत डाउनलोड करता येते. या ॲपमुळे केवळ रुग्णवाहिकेशी संपर्कच साधता येणार नाही, तर प्राथमिक उपचाराची माहितीही यामध्ये दिली आहे. त्यामुळे रुग्णवाहिका पोहोचण्यापूर्वी रुग्णाला काही आवश्यक मदत दिली जाऊ शकते. जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सुहास माने व १०८ चे मुख्य अधिकारी डॉ. ज्ञानेश्वर शेळके यांच्या मार्गदर्शनाखली वारकरी भाविकांना पालखी मार्ग, तळांवर तसेच पंढरपूर शहरात आरोग्य सुविधा देण्यात येणार असल्याचे जिल्हा व्यवस्थापक सोलापूर डॉ. अनिल काळे यांनी सांगितले.

यावेळी डॉ. मेघना झेंडे ट्रेनिंग डिपार्टमेंट हेड , डॉ. किशोर देव ऑपरेशन हेड, डॉ. प्रियंक जावळे, जिल्हा व्यवस्थापक पुणे, डॉ. अनिल काळे जिल्हा व्यवस्थापक सोलापूर ,डॉ. कौस्तुभ घाटुळे जिल्हा व्यवस्थापक सांगली, डॉ. प्रतिक पाटील, डॉ. सीमरण केशवाणी, सुनिल चव्हाण, यूवराज वाघ, दिलीप शिंदे, महेश कदम उपस्थित होते.